ISSN : 2454-7905

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 4, Vol.I, Issue-XV, December 2018

Editor : Mrs. Pallavi Laxman Shete

Quarterly Research Journal

SIDDHI PUBLICATION


सिद्धी प्रकाशन

श्रीनगर, नांदेड.

येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.

पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.

संपर्क : डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर, सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067




SIDDHI Siddhi Prakashan

ISSN: 2454 - 7905

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

Vol. I ISSUE - XV Year – 4 December 2018

**Editor in Chief**

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Telephone No. : 02462 250389

**Email:**anupamxptejas@gmail.com

**Address for Correspondence**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,
Taroda (KH), Nanded – 431605
(India -Maharashtra)

**www.nandifoundation.com**

**Email:**umbarkar.rajesh@yahoo.com

Shrishprakashan2009@gmil.com

**Mob. No:** 9623979067

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | THE STATUE OF UNITY: CAN IT BECOME THE NEW MAGNET OF TOURISM FOR INDIA | Dr. Rajesh Gangadharrao Umbarkar | 01 |
| 2. | जिला सहकारी केंन्द्रीय बैक द्वारा किसान क्रेडिट कार्ड के अन्तर्गत अल्पावधि कृषि ऋण के वितरण एवं वसूली का अध्ययन | अमित कुमार ठाकुर<br>डॉ. ओ.पी. चन्द्राकर | 06 |
| 3. | POLICY OF MARATHA REGARDING NORTH & SOUTH REGIONS DURING PESHWA PERIOD | Dr. Rahul Varvantikar | 12 |
| 4. | THE MANAGEMENT OF ADULT ONSET OF STILL'S DISEASE BY AYURVEDA : A CASE STUDY | Vd. M. W. Nalkande<br>Vd. Monika A. Surpam<br>Vd. V. E. Gogate<br>Vd. S. Suyvavanshi | 15 |
| 5. | A CASE CONTROL STUDY OF NIMBTILADI MADHUSARPIVARTI IN THE MANAGEMENT OF VIDRADHI BHEDANA AND VISTRAVANA (I & D), | Gayatri Mawale<br>Priyanka Khobragade | 24 |
| 6. | A COMPARATIVE STUDY OF THE PHYSICAL FITNESS LEVEL OF ENGLISH AND MARATHI MEDIUM SCHOOL GOING STUDENTS. | Dr. Sangharsh Sumangal Shrangare | 29 |
| 7. | आधुनिक तंत्रज्ञानामुळे बदलला शिक्षणाचा चेहरा | प्रा.अर्चना राम भारती<br>डॉ. उज्वला के. सदावर्ते | 32 |
| 8. | ISSUE AND CHALLENGES FOR SELLING PRODUCTS & SERVICES IN INDIAN ECONOMY | Prof. P. Y. Nangre | 34 |
| 9. | IMPORTANCE OF RŪDRĀDHYĀYAH IN NIGAMA & ĀGAMA | Dr.Shashikant B.Dargu | 40 |
| 10 | म. गांधीं संबंधी नरहर कुरुंदकरांचे विचार | प्रा. उद्धव गणपतराव निर्वळ<br>प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण | 42 |

# म. गांधीं संबंधी नरहर कुरुंदकरांचे विचार

**संशोधक - प्रा. उद्धव गणपतराव निर्वळ**
माधवराव पाटील महाविद्यालय, पालम जि. परभणी
**मार्गदर्शक - प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण**
**दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर जि. नांदेड**

भारतात अनेक धर्म असूनही लोक अगदी एकमेका सोबत गुण्या गोविंदाने आणि पर्यावरण पूरक अशी जीवन शैली जगत होते. प्रत्येक भागाचे वेगवेगळे वैशिष्ट्य असूनही भारतीय संस्कृतीत उच्चतम मूल्यांच्या आधार अहिंसा होता खर म्हणजे ती एक निसर्गानुंकुल अशी जीवन पद्धती होती आजही ती भारतीयात दिसते तिला शतकानुशतकांचा आधार आहे. सर्व धर्माचे अनुयायी भारतात नांदतात हि एकाच भूमी एवढी विस्तीर्ण व विविध वैशिष्ट्यांनी नटलेली आहे की इथे आत्मिक असे नाते बनलेले आहे. या आधारे गांधीजीनी आपला मार्ग आखला "प्रेम" हाच त्याचा आधार बनला व त्याला "अहिंसा" या नावाने आधीपासुनच मान्यता होती याचे अनुकरण पुढे सर्व भारतभर झाले. सत्य-अहिंसा हा मानवी वर्तनुकीचा वस्तुपाठ गांधीनी दिला. १

महात्मा गांधी आधी भारतभर फिरले ते हि रेल्वेच्या तिसऱ्यां वर्गाने का? कारण खरा भारत पहायचा होता. समजून घ्यायचा होता त्यांच्या निरीक्षण शक्तीने त्यांना जे पाहता लाले त्याचा उपयोग पुढच्याकाळात त्यांनी केला. नरहर कुरुंदकर म्हणतात त्या प्रमाणे वरकरनी कितीतरी विसंगती वाटणारे गांधीचे वर्तन व भूमिका खोलात गेल्यावर त्यात एक निश्चीत सुसंगती आपल्याला दिसून येते. २

समाजाच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रीयेला आणि मानवतेच्या विकासाला विज्ञानाचे फार मोठी मदत केलेली आहे हे मान्य केलं तरी विज्ञान माणसाला वरदान ठरण्याऐवजी शाप ठरू पाहत आहे याबाबत तुम्हाला काय म्हणायचे आहे.?या प्रश्नाला उत्तर देतांना नरहर कुरुंदकर म्हणतात'

"विज्ञान हे माणसाला शाप ठरू पाहत आहे म्हणताना सर्वानाच्या डोळ्यासमोर प्रामुख्याने विज्ञान युगातील शस्त्रे उभी असतात. दुसरे महायुद्ध संपताना अण्वस्त्रांचा वापर नागासाकी आणी हिरोशिमावर झाला. ज्याप्रकारे अणुबॉम्ब जपान विरुद्धच्या युद्धात या दोन शहरांच्यावर टाकले गेले होते त्यापेक्षा कितीकारी पतीने भयानक अशी अण्वश्त्रे आता सुधारलेल्या राष्ट्रांनी निर्माण केली आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीच्या वेळी हे बॉम्ब टाकण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या विमानांची गरज लागत असे, आता विमानांच्या ऐवजी प्रक्षेपणअस्त्रांचा वापर होण्याची शकता आहे.याचा अर्थ असकी,रशिया आणी अमेरिका यांच्याजवळ त्यांनी मनात इच्छा आणली तर संपूर्ण मानव जात नष्ट करण्याचे सामर्थ एकवटलेले आहे.ज्या प्रमाणात विधवंशक शश्त्रांची निर्मिती वाढत गेली आहे त्या प्रमाणात हे ज्ञान असणाऱ्या राष्ट्रांची संखाची थोडीफार वाढलेली आहे. दुसर्या महायुद्धाच्या शेवटी फक्त अमेरिकेजवळ आण्वश्त्रे होती. आज त्याचा बरोबर रशिया, चीन, इंग्लंड आणि फ्रांस हि राष्ट्रे आलेली आहेत आणि भारतासारखा अजूनही काही राष्ट्रे आहेत की ती ज्या

दिवशी ठरवतील तेंव्हापासून सहा महिन्याच्या आत अण्वस्त्रधारी होऊ शकतील. अण्वस्त्राचा हा प्रसार भयावह आहे हि गोष्ट म्हणजे तिसरे जागतिक महायुद्ध हा मानवजातीचा शेवट आहे,याची जाणीव झाल्यामुळे व्यापक प्रमाणावर महायुद्ध होणायची शक्यता जवळपास संपूष्टात आलेली असून एक नव्या पद्धतीच्या अतंरराष्ट्रीय राजकारणाला आरंभ झाला आहे. अण्वस्त्रांच्यायोगाने माणसांची संहारक शक्ती एवढ्या प्रचंड प्रमाणात वाढवून टाकलेली आहे की, महायुद्धाची शक्यताच संपली असून, जागतिक महायुद्ध टाळण्याच्या प्रयत्नात आता अमेरिका आणी रशिया यांच्या बरोबरीने चीनलाही सहभागी होणे भाग पडले आहे.मानव जातीच्या अस्तिवाचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे व्यापक प्रमानावरचे महायुद्ध हि संकल्पना आता शक्य झालेली आहे. त्यामुळे छोट्या राष्ट्रांना अधिक निर्भयता प्राप्त झालेली आहे. छोटी आणि दुबळी राष्ट्रे निर्भय आहेत एवढी निर्भय यापूर्वी कधीच नव्हती". ३

वाटा तुझ्या माझ्या या पुस्तकातील मुलाखतीतून पुढे गांभीर्याने नरहर कुरुंदकर इशारा देतात. "याचा अर्थ आजच्या जगात आक्रमन अशक्य आहे.अत्याचार अशक्य आहे किव्हा एखाद्या राष्ट्राला गुलाम करणे अशक्य आहे.असा नसून याबाबत संघर्षाच्या मर्यादा बऱ्याच लहान झाल्या आहेत. इतकेच मला म्हणावयाचे आहे. पण या युद्धाच्यापेक्षा शांततेच्या बाजूने विज्ञानाचा धोका अधिक मोठा आणि भयावह आहे.आज एकाचे डोळे दुसऱ्याला बसविण्याचा एकाचे अवयव दुसऱ्याला बसवण्याचा प्रयत्न चालू आहे. पुरुषापाशी संयोग न येता कृत्रिम गर्भधारणा हि आता आटोक्यात घटना असून अंडी उबवण्याचे कार्य करण्यासाठी सुधारलेल्या देशात यंत्राचा वापर चालू आहे.या संशोधनाचा शेवट स्त्री अगर पुरुष कुणाचीही मदत न घेता प्रयोगशाळेत अपत्यानिर्मिती संभवनीय करण्यात एक दिवस होणार आहे. ज्या दिवशी हे जमेल त्या दिशी गाजेनुसार बनवता येणारे यंत्र आणी मागणीनुसार पुरवठा करण्याजोगी एक वस्तू इतकेच माणसाचे स्वरूप ठरण्याचा धोका आहे. हे ज्या दिवशी घडेल त्या दिवसी मानवी मूल्यात एक प्रचंड उलथापालथ घडून येणार आहे. तिची कल्पना सुद्धा भयावह आहे. मला संशोधनाच्या या शाखेची चिंता जास्त वाटते." ४

विज्ञानाचा हा भयानकपण आपण गृहीत धरला तरी त्यातून सुटण्यासाठी आपल्याला वाट कोणती आहे हे कळणे मात्र कठीण आहे. विज्ञानाची कास न धरता आपण कालचक्र फिरवून मागे जाऊ शकतो काय हा प्रश्नच आहे. ज्या वेळी आपण प्रत्येक माणसाला पोटभर अन्न, अंगभर वस्त्र, आणि आवश्यक असणारे शिक्षण अशी घोषणा करतो त्या वेळीच आपण विज्ञानाला शरण गेलेलो असतो. शक्य तेथे मोठी धरणे आणि हे अशक्य होईल तेथे छोटे बंधारे आणि कालवे एकीकडे आणि विज्ञानाने अस्तित्वात असलेल्या बिजांच्या सुधारलेल्या जाती व रासायनिक खाते दुसरीकडे असा विचार केल्याशिवाय सर्वाना पोटभर अन्न हि संकल्पना संभवत अनही. यंत्राचा विरोध करतांना आपण हे विसरू शकत नाही की, परंपरागत शेतीची पद्धती, बियाणे आणि खते यांच्या जोरावर भारताची जमीन पंचावंन्न कोटी लोकसंखेचे ओझे उचलू शकणार नाही आणि प्रत्येकाला अंगभर वस्त्र म्हटल्यानंतर लागणारे कापड हातमाग आणि गिरण्या तयार करू शकणार नाही.प्रतेकाला शिक्षण द्यायचे तर कागदाचे कारखाने आणि छापखाने आपण टाळू शकत नाही. करण अधिक पुस्तके व वह्या कोठ्याधी विध्यार्थ्यांना पुरविणे भाग आहे. ज्या वेळी देशाची लोकसंख्या वीस कोटी होती त्याही वेळी दर दशकात

प्रचंड दुष्काळ भारतात होतेच आणि त्या काळात ७५ टक्के लोकसंख्या अर्धनग्न होती. किमान सुसंस्कृत जीवन सर्व माणसांच्यासाठी उपलब्ध करून देण्याचा मुद्दा वैज्ञानिक दृष्टीकोनाशी अपरिहार्यपाने बांधला गेलेला आहे. याठीकानावरून मागे सरकण्यासाठी आपल्याला कोणताही रस्ता नाही. ५

एकीकडे विज्ञानाची भयावहता आपण मान्य करतो, दुसरीकडे विज्ञानाची अपरिहार्यता आपणाला जाणवते. या सीमारेषेवर उभे असताना विज्ञानाकडे आपला न टळणारा सोबती म्हणून पाहावे लागेल. आणि मग विज्ञानाच्याबाबत प्रमाणाचा व प्रसाराचा विचार करावा लागेल. या ठिकाणावरून आपण आलो म्हणजे म. गांधींच्या भूमिकेचा गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण होते.

म. गांधी विकेंद्रीकरणाचे आणि ग्राम-स्वराज्याचे पुरस्कर्ते होते हि गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळी परदेशातून येणारा मल हा भारताच्या आर्थिक शोषणाला साह्यकारी होतो. म्हणून स्वदेशाचा आग्रह लोकहितवादिंपासून धरण्यात आला. टिळकांच्या काळी हा आग्रह वाढला. गांधीजींनी त्याला एक व्यापक चळवळीचे स्वरूप दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण प्रचंड प्रमाणत विदेशी मदत घेऊन या देशाचे यांत्रिकीकरण करीत आहोत. विदेशी मालावर बहिष्कार हि संकल्पना आपण स्विकारली, आजही सर्व बाबतीत भारत स्वावलंबीकरावा या मुद्द्यावर आपला सर्वांचा आग्रह आहे. पण विदेशी म्हणून यंत्रोउत्पादनाचा त्याग करण्याची तयारी जरी अपना ठेवली तरी मुळात यंत्रांना विरोध करण्याच्या मुद्द्यावर गांधीजी कॉग्रेसचेही समाधान करू शकले नाहीत. कॉग्रेस संघटना नेहमीच आधुनिक यांत्रीकीरानाची समर्थक राहिली. कॉग्रेस हि यांत्रिकीकरणाची समर्थक असण्याचे करण ती भांडवलदारधार्जिणी संस्था आहे. इतकेच नव्हे तर भांडवलदारधार्जिपने नसणारे समाजवादीहि आपल्या प्रजेला पोटभर अन्न-वस्त्र देण्याच्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाहीत आणि म्हणून यंत्राच्या स्वीकाराच्या जबाबदारीला ते टाळू शकत नाहीत. ६

"गांधीजींच्या यंत्रविरोधी भूमिकेला एक नवे स्पष्टीकरण आपण जोडू शकतो. तसे जोडलेही जात आहे. अलीकडे सर्वोदयवादी म्हणतात की, आमचा यंत्राला विरोध नाही पण यंत्राने माणसाची जागा घेऊन माणूस बेकार करावा याला आमचा विरोध आहे. यंत्र हे माणसाची शक्ती वाढविणारे त्याला उपकारक असावे. माणसाची जागा घेणारे नसावे. हे मूळ प्रश्नापासून एक प्रकारचे पलायन आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. टकळीवर एक माणूस वर्षभर दोन माणसांच्यापुर्ते वस्त्र निर्माण करू शकतो. असे म्हटले तर सर्वांना अंगभर वस्त्र मिळण्यासाठी ५० टक्के लोकसंख्येला पूर्ण वेळ काम म्हणून सुत काढण्याचे काम द्यावे लागेल. हे कोणत्याही समाज व्यवस्थेला परवडणारे नाही. टकळीऐवजी आपण चरखा वापरला तर उत्पादन दुप्पट होते, त्यावेवजी अंबर चरखा वापरला तर उत्पादन अजून वाढते. यंत्रावर सुत काढले तर उत्पादन अजून वाढते. अशा प्रकारे यंत्र हे मूलतः माणसाची शक्ती वाढवित असते. प्रश्न फक्त हा आहे. की, ज्या वेळी एक माणूस टकळीच्या १०० पट उत्पादन करतो त्या वेळी लोकसंख्येच्या १/१० भाग कपडा उत्पादनात वापरणे आपल्याला पुरेशे होते. माणसाला मोकळा वेळ मिळावा किती? त्याच्या गरजा किती? गरजांना प्राधान्य किती द्यावे? या प्रश्नांची उत्तरे देत देतच आपण जीवनात यंत्राचे प्रमाण ठरवू शकतो, यंत्राची गुंतागुंत केवळ विज्ञानाचे शोध वाढवीत नाहीत, तर

समाजाची गरज वाढवीत असतात. अशा अवस्तेत यंत्रापासून आपली सुटका नाही. ज्या जगात यंत्राचे प्रमाण कमी होते ते जग फारसे सुखी नव्हते. अशिक्षित, अर्धपोटी, गुलामिनी भरलेले असे ते जग होते. ७

या संदर्भात फक्त प्रमाणाचा विचार होऊ शकतो, प्रकारचा विचार होऊ शकत नाही यंत्रे कोणती वापरावी किती प्रमाणात वापरावी ? याचा विचार आपण करू शकतो. विज्ञान कोणत्या दिशेने वापरावे? किती प्रमाणत वापरावे; याचाही विचार करू शकतो पण विज्ञानाचा वापर करावा की नाही हे आपण ठरवू शकत नाही. करण विज्ञानाला दुसरा पर्याय नाही. विज्ञान जी संकटे निर्माण करते त्याचे उत्तर विज्ञानाचा त्याग करून देता येत नाही. तर विज्ञानाचा स्वीकार करूनच विज्ञानाने निर्माण केलेल्या संकटाबाबत वैज्ञानिक उत्तरे हुडकावी लागतात. १९ व्या शतकातील विचारवंताच्या समोर विज्ञान हि देवता होती, २० शतकातील विचारवंताचा विज्ञान हा न टळणारा सहकारी झाला आहे.

राजकारण - समाजकारणापासून तोडून संत करायचे ठरवले असेल तर हा अख्खा हिंदू संत या देशातील धर्मातील समाजंवादी प्रवाहाला पचण्यास जड होईल. आणी हा संत हिंदुत्ववादी राजकारणात पार पचवला जाईल. शिवाजी हा या देशातील स्वातंत्र्यलढ्याला विरोध करणाऱ्या हिंदुत्ववाद्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात जसा वापरला तसा गांधी हा धार्मिक राजकारणाच्या सोयीसाठी वापरला जाण्याचा धोका आहे. गांधीना 'राष्ट्रपिता' म्हणचे या प्रश्नाच्या नेहमी स्वच्छपणे विचार केला पाहिजे.

म. गांधीना आपण 'राष्ट्रपिता' का मानतो? या प्रश्नाच्याकडे वळण्याच्या पूर्वी एक-दोन मुद्याच्याबाबत थोडासा खुलासा करणे आवश्यक आहे.त्यांपैकी पहिला मुद्द्दा म्हणजे , मुस्लीम प्रश्नांच्याबाबत महात्मा गांधीना आजवर अनेकांनी अनेक प्रकारे बदनाम करण्याचा प्रयत्न्न केला आहे. गांधीन्जीच्यावर मुख्य आरोपच मुसलमानधर्जीणेपणाचा आहे. हा आरोप स्वातंत्र्यपूर्वकाळात मोठमोठ्या व्यक्तींनी उच्च स्वरात केला आहे. इ.स. १९२० च्या सुमारात खिलाफत चळवळीचे रूप पाहून किंवा १९४५ साली जिनांना वारंवार भेटण्यासाठी जाणारे गांधीजी पाहून समकालीनांनी गांधीजिंच्यावर मुस्लीम धार्जिनेपनाचा आरोप केला असेल, तर तो समर्थनीय मानला नाही तरी त्या वातावरणात आपण क्षम्य माणू शकतो. समकालीनांनी केलेले मूल्यमापन महत्त्वाचेही असते, तसेच ते चुकेचेही असू शकते. पण स्वातंत्र्योत्तर काळात आता गांधीजीच्या मृत्यूला २० वर्षे उलटून गेलेली आहेत. इतक्या दूरच्या काळातील लोक ज्या वेळी त्यांना अडाणी तरी म्हटल पाहिजे, किंवा अप्रामाणिक तरी म्हटले पाहिजे! आणि मुख्य म्हणजे, अप्रमानिकच म्हटले पाहिजे. कारण असा आरोप करणारी माणसे पुरेशी शहानी व जाणकार आहेत. ८

**आश्रमांची निर्मिती आणि आवश्यकता - Ashramachi Nirmiti :-** गांधीना हे माहित होते की, बर्याच गोष्टी आपल्याला कराव्या लागतील, शासनाकडून अपेक्षा करणे चुकीचे आहे तेव्हां शासनचा कमीत कमी हस्तक्षेप त्यांना हवा होता. परंतु काही सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी खऱ्या कार्यकर्त्यांची गरज आहे हि कोण पुरवणार? त्या साठी प्रशिक्षण व मार्गदर्शनाची गरज गांधीना महत्वाची वाटते. हया कार्यकर्त्यांकडून विधायक व रचनात्मक कार्याची अपेक्षा गांधीनी व्यक्त केली. ते कार्यकर्ते आपल्या आचरणातून हे घडवून अनु शकतात एक एक कार्यकर्ता गावागावात पोहचल्याशिवाय

खरे परिवर्तन घडून येणार नाही ते म्हणतात म्हणून गुजरातला "साबरमती" वर्धाला "सेवाग्राम" ह्या आश्रमची निर्मिती केली गेली असंख्य "जीवनदायी"कार्यकर्ते घडविणारे ते कैंद्र होते. व आजही आहे. व्यावहारिक जिवन अध्यात्माकडे जोड दिल्याने हे कार्य अव्यातपाने चालू आहे. खरी जीवन पद्धती हीच आहे. ९

माणसाच्या मुलभूत प्रश्नाची सोडवणूक गांधी विचारात आहे आजच्या काळात हि ती उपयोगी आहे कारण अजून तरी तिला पर्याय समोर आलेला नाही गांधी विचारला ज्ञान,परंपरा आणि शास्त्राचा आधार आहे.म्हणून तर ते नवल आहे फक्त गरज आहे.ती तो विचार समजून घेण्याची आणि समजल्या नंतर त्याचा प्रचार करून अंगीकारण्याची. तरच प्रश्नंची उत्तरे आपल्याला मिळू शकतील त्या साठी गरज आहे ती इच्छाशक्तीची.

**महात्मा गांधींच्या राजकीय तंत्राची आजची गरज:- Today's need of Gandhian political technologies**

१) **पक्ष पद्धतीचा विपर्यस्त विकास :-** गांधीना अभिप्रेत असलेली पक्ष पद्धती आज जि दिसते ती खचितच नव्हती. लोकशाही संसदीय शासन पद्धतीत लोकांनुवर्ती पक्षांनी युक्त असली पाहिजे म्हणजे हि व्यवस्था माणूस कैंद्र स्थानी मानणारी पाहिजे असे त्यांना वाटे संस्था पक्ष लोकांना वेठीस धरणारे नाही पाहिजेत. जुलूम जबरदस्ती, खोटाप्रचार याला तिथे थारा नव्हता म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्यनंतर कॉग्रेसचेही विसर्जन करण्याची सूचना केली होती. गांधीनी अपक्ष पद्धतीचे समर्थन केले होते.

२) राज्यव्यवस्थेतील संघर्ष : Conflict in political system

केंद्र सरकार राज्य सरकारे यांच्यातील अधिकारांची वाटणी यात झुकते माप राज्या ऐवजी केंद्राला मिळाले पुन्हा राज्यामध्ये केंद्र विभाग अशी साखळी वरून खालती हा क्रम निवडला गेला यासाठी मजबूत संघ राज्य निर्माण झाल पाहिजे परंतु यावरून काहीतरी वेगळा मार्ग पाहिजे असे गांधीना वाटत होते निदान सरकारे केंद्र असो व राज्यांची त्यांनी स्थानिक लोकांना त्यांचा व्यावस्थे प्रमाणे अधिकार द्यावेन की जेने करून त्यांच्या जीवनात उंचावेल व देशाचीही प्रगती होईल देशाच्या राज्याच्या कायदे मंडळातून माणूस हद्द पार होऊ नये असेच त्यांना वाटे म्हणूनच स्वावलंबी खेडे यावर त्यांनी भर दिला

३) **सत्तेचा केंद्र बिंदू खेडेगाव : village is centre point of power**

भारतातील सत्तेचा कैंद्र बिंदू खेडेगाव असले पाहिजे करण भारत हा खेडे गावांचा देश आहे खेडे सुधारतील तर देश सुधारेल अशी गरम कैंद्र सत्तेची भूमिका मांडायची होती

४) **मास पोलिटिक्स : mass politics** राजकारणाच्या संदर्भात महात्मा गांधी मास पोलिटिक्स भूमिका महत्वाची मानतात करण भारताला स्वतंत्र मिळाल्या नंतर हा देश माझा आहे अशी जाणीव समाजातल्या सामान्य माणसाला वाटली पाहिजे यासाठी गांधीजी म्हणतात. देशाच्या व्यवस्थेला जनता कैंद्र बिंदू असली पाहिजे

५) **लोकप्रतिनिधींना सामाजिक सेवेचा आधार : Representative through social service base.**

आजच्या काळात जे लॉक प्रतिनिधी विविध माध्यमांचा व साधनांचा आधार घेऊन शोषण करणारे प्रतिनिधी बनतात त्यामुळे स्वकेंद्रित राजकारण व सत्ताकारण झाले त्यामुळेच महात्मा गांधीजींनी भविष्याचा वेध घेऊन लॉक प्रतिनिधी व सामाजिक सेवेवर निवडला जावा अशी भूमिका मांडतात. क्रांतीसाठी साधन सुचिता महत्वाची साध्यापेक्षा साधन महत्वाचे आहे. क्रांती निर्माण करून राजकारण हे गांधीजींचे राजकीय तंत्र होते

६) चुकीचे विकासाचे पाश्चात्य मॉडेल : Western model of development

स्वातंत्र्य पूर्व काळापेक्षा स्वातंत्र्यानंतर काळात प्रशासनातील गुंतागुंती वाढल्या आहेत केंद्र, राज्य सरकारे त्यांचे नियम व कायदे त्यासाठी यंत्रणा यातील समन्वय राहिला नाही. परिणाम काय झाल्यावर विकासाचे पाश्चात्य मॉडेल आपण स्वीकारले व नको नको म्हणताना विकास लादला जुन्या पारंपारिक जीवन पद्धतीला मूल्य युक्त जीवन क्रम ऐवजी भौतिक झगमगाट आम्ही स्वीकारला व त्यासाठी नवे कायदे त्यांची अंमल बजावणी यंत्रणा इ विविध विचार प्रवाहांना सोयीचा कायदा न राहता विभक्तीकरणाचा वास त्या कायद्यांना येऊ लागला तिथे राष्ट्रीय प्रादेशिक असे हितसंबंध जोपासले गेले एकूणच काय तर भारतीय प्रशासन सेवा जणू खेड्यातील सामान्य माणसासाठी नाहीच ती केवळ शहरापुरतीच मर्यादित राहिली तिथेही वरून खाली हि उतरंड अधिकाऱ्यांची राहिली.

**७) हे सारं कशासाठी? Why purpose of this?**

महात्मा ग्नाधीजींना स्वातंत्र्याची घाइ नव्हती त्यांना फक्त एवढीच काळजी होती की इथल्या सामान्य माणसांना त्यांच्या मर्जी प्रमाणे जगता आले पाहिजे कायदे प्रशासन त्याला अडचण करणारे नसावे जमलाच तर त्याला मदत करणारी यंत्रणा असावी. सामान्य माणूस हाच केंद्र बिंदू असावा यासाठी ते तडफडत होते.

**८) माझे सत्याचे प्रयोग: My experiments of truth**

माझे जीवन हाच माझा संदेश असे सांगणाऱ्या बापूंनी आपल्या आत्मकथेतून बऱ्याच गोष्टी स्पष्ट करून सांगितल्या आहेत. आपला प्रवास कसकसा झाला हे ते अतिशय स्पष्ट शब्दात विषद करतात. कुठलाही बडेजाव न करता त्यांनी आत्मकथा लिहिली 'महादेवभाई देसाई' त्यांचे सहकारी होते.९ त्यांनी गांधी कथेतून हे सारे पदर उलघडून दाखवले आहेत. केवळ सत्य शोधन हाच गांधीजींचा हेतू होता. एका सामान्य माणसाचे महात्म्यात रुपांतर कशे होते याचे भाव यातून येते. तेव्हाचे प्रश्न यावर केलेली चर्चा व यश मिळणारे सत्य अहिंसा हे सूत्र याची चर्चा आहे. काही कौटुंबिक व खाजगी गोष्टी आहेत, दक्षिण आफ्रिकेतील अनुभव हीच आहेत. सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे हे आत्मचरित्र आरशा सारखे स्वच्छ आहे. गांधी विचार न रुचणाऱ्या मंडळींनाही याची जादू कमी करता आली नाही. उलट गांधी हत्ते नंतर त्याचा सर्व जगभर प्रसार झालेला आहे. यातून अनेकांना लढण्याची प्रेरणा मिळाल्याचे दिसून आले आहे. उदा - नेल्सन मंडेला , कु.मलाला इ. ९

९) हिंदू स्वराज्य : Hind Swaraj

इ.स. १९०९ साली गांधीनी हे छोटे पुस्तक लिहिले आज १०० वर्षांनीही ते किती उपयोगाचे आहे. हे पुस्तक वाचल्यावर आपल्याला लक्षात येईल ! प्रश्नोत्तर रूपाने जवळपास आजच्या सर्वच प्रश्नांची चर्चा आणि उत्तरे या पुस्तकात आहे. फक्त आपणा त्याकडे लक्ष दिले पाहिजे काही मुलभूत प्रश्न जशेच्या ताशे आ वासून आजही उभे आहेत. उदा बेकारी दारिद्र्या यान्त्रीकीकारणाने वाढल्याचे दाखते यात आहेत. हिंदुस्तानची आर्थिक लुट कशी झाली आहे. याचा तपशील हिंदुस्थानची दशा इतक्या सोप्या शब्दात अधिक स्पष्ट करून सांगणारे अजूनही दुसरे पुस्तक नाही. त्यातून सुटका कशी होणार याची सविस्तर चर्चा त्यात आहे. विशेषतः आपल्या सरकारचा १९९० नंतरचा जागतिकीकरणाचा प्रवास आणि त्या नंतरचे प्रश्न उपस्तीत झाल्याने हिंद स्वराज्याचे महत्व वाढले आहे पुन्हा आपला प्रवास अंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिकव्यापार करार, (G.A.T.T) यांच्या कायदेशीर कचाट्यात आपसूकपणे होत आहे, झाला आहे. याही प्रश्नाची उत्तरे आपल्याला हिंद स्वराज्य मधूनच मिळू शकतात. हे 'सु. श्री. पांढरीपांडे' यांनी 'हिंद स्वराज्य' आणि नवे मन्वंतर यात स्पष्ट केले आहे. फक्त त्याकडे नव्या दृष्टीकोनातून बघण्याची गरज आहे. एकंदर आपला प्रवास परत गुलामिकडेच झाल्याचे आपल्या लक्षात येईल. ज्या पश्चात्य सभेचे आकर्षण आपल्या राज्यकर्त्यांना वाटले त्या सभ्यातानी त्यांचे देश कशे उद्ध्वस्थ झाले आहेत. त्यात मूल्य व तत्वांचा अभाव आहे. हे आपल्याला दिसेल पण ऱ्हासाचा चालू झाला आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्यांनी हे दाखवून दिले आहे. १०

**१०) महात्मा गांधींची राजकीय अस्त्रे :** Weapans of G.P.T. Advance Political Theory "S.L. Varma"

**१) प्रश्नांची मांडणी व प्रदर्शन :** राजकीय जीवनात प्रश्नांची सोडवणूक हि अतिशय महत्वाची बाब गांधीजींना वाटते. अचूकपने प्रश्न समजून घेऊन त्यांच्या कारणांचा शोध घेत ते सोडवण्याचे प्रयत्न करणे महत्वाचे असते , त्यात शक्य तो पारदर्शीपणा असावा यामुळे ज्या कारणाने हे प्रश्न निर्माण झाले ती व्यक्ती , संस्था, शासन इत्यादी कोणतेही घटक याचा हि बाब लक्षात घेऊन त्या व्यक्तीचा दृष्टीकोन बदलून तो प्रश्न सुटण्यास मदत होते. अन्याय निवारणासाठी हि आवशक गोष्ट आहे यालाच गांधी 'ह्रदय परिवर्तन' असे म्हणतात. ११

**२) पदयात्रा - padayatra :** प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आल्या नंतर त्या विषयीची जागृती पण ती शांतीने आणि अहिंसक मार्गाने पड यात्रेद्वारे करता येते.

**३) धरणे - dharane:** त्यानंतर हि प्रश्न सुटला नाही तर धरणे आंदोलन हा मार्ग शांततेने योजता येईल

**४) आत्मक्लेश – atmaklesh:** त्याचाही फायदा झाला नाही तर आत्मक्लेश करून घेणे, दुसात्यांना करणे नाही हा मार्ग गांधी सुचवतात

**५) हरताळ – Haratal :** त्या नंतर संप किवा हरताळ हा मार्ग गांधी निवडतात त्यातून आपल्या भावना कळविणे हे महत्वाचे पण हे करताना सार्वजनिक क्षमता धोक्यात येऊ नये.

**६) सामाजिक बहिष्कार - samajik bahishkar :** यानंतर सामाजिक बहिष्कार घालूनही नाकोते धोरण आणि नाकोती वस्तू आपण जागृतीद्वारे करू शकतो, यामुळे अन्याय निवारणात उर्जा कमी येईल अशी गांधींना खात्री होती.

परदेशी कापडाच्या बाबतीत हे 'अस्त्र' प्रभावीपणे वापरले गेले. लोकमान्य टीळकानीही स्वातंत्र्य आंदोलनात बहिष्काराचा मार्ग वापरला होताच. त्यांच्या मते त्यातून होणारी भारतीयांची आर्थिक लुट थांबेल. पुढे महात्मा गांधी यांनी याला पर्याय खादीचा दिला त्यामुळे या साधनाचे महत्व वाढले.

**७) चरखा - Charakha:** नुसता बहिष्कार घालून उपयोगाचे नसते तर त्याला पर्याय म्हणून सुती कपड्याची खादी निर्मिती करून आपण त्याला प्रतिष्ठा मिळून दिली पाहिजे. हे वस्त्र हाताला काम पुरविते म्हणून गरिबी बेकारी यांच्या ते विरोधात आहे असे गांधी म्हणतात. माझ्या राजकीय जीवनात चरख्याला अतिशय महत्व असल्याचे ते सांगतात. चरख्याविषयी हिंदस्वराज्या मध्ये गांधीनी १९०९ साली लिहून ठेवले असले तरी प्रतेक्षात मात्र गांधीना तो गुजरातमध्ये नंतर 'गंगाबेन' यांनी दाखवीला असे गांधीजी म्हणतात. खादी विषयी आजही खूप चांगली जागृती आणि शासकीय धोरण आखण्याची गरज आहे. भारतासारख्या देशाला स्वयंरोजगार निर्माण करणारी यंत्रणा व शेती-पूरक असा हा चरखा आहे.

**८) निदर्शने –nidrashane:-** निदर्शने करून आपण आपले म्हणणे काहीही हिंसा न करता मांडू शकतो. पण परिणाम मात्र खूपच चांगले हाती येतात. म्हणून त्यांना गांधीनी पसंती दिली.

**९) साराबंदी –sarabandi:-** द. आफ्रिकेतील आपल्या अनुभवातून गांधीनी हे अस्त्र भारतात वापरले निळ उत्पादन शेतकऱ्यांचे प्रश्न पंचारन्य चळवळीतून सोडवताना याचा फायदा झाला साराबंदी बे हि आंदोलनाला गती येते.

**१०) असहकारिता आंदोलन - asahakarita andolan:-** स्वातंत्र चळवळीत १९२१ साली त्यांनी ब्रिटीश सरकारच्या विरोधात हे आंदोलन केले कोणत्याही प्रकारचे सहकार्य शासनाला करायचे नाही असा हा कार्यक्रम आहे.

**११) सविनय कायदे भंग -savinay kayade bhang:-** १९३०साली महात्मा गांधीनी हे आंदोलन केले. आपले प्रश्न सुटत नाहीत तो पर्यत कोणताही कायदा पाळायचा नाही. तर तो मोडायचा पण शांततेच्या मार्गाने असा आग्रह गांधी धरतात. १२

**संदर्भ -**


१) माझे सत्याचे प्रयोग - महात्मा गांधी
२) हिंद स्वराज्य - महात्मा गांधी परंधाम प्रकाशन पवनार १९९०
३) आकलन - नरहर कुरुंदकर निर्मल प्रकाशन नांदेड
४) वाटा तुझ्या माझ्या - नरहर कुरुंदकर देशमुख आणि कंपनी पुणे
५) किता पान क्र. ७१
६) किता पान क्र. ७२
७) किता पान क्र. ७३
८) श्री गोळवलकर गुरुजी आणि महात्मा गांधी नरहर कुरुंदकर मुंबई सर्वोदय मंडळ मुंबई २००२
९) सत्याग्रह - म. गांधीचा दृष्टीकोन - डॉ. नागोराव कुंभार प्रबोधन प्रकाशन लातूर
१०) म. गांधींचे हिंद स्वराज्य 'आणि नवे मन्वंतर' - सु श्री पांढरीपांडे प्रतिमा प्रकाशन पुणे
११) गांधी विचार-संपादक डॉ. पंजाब चव्हाण निर्मल प्रकाशन नांदेड
१२) Advance Modern Political Theory – S. L. Varma Rawat Publication Mumbai 2008